डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर.

विद्यार्थी विकास विभाग

संचालक (का.) २४०३१३२
विद्यार्थी विकास २४०३१३३
फॅक्स : (०२४०) २४०३१३४, २४०३१५०
तार : बामुसिटी
Web Site : www.bamu.net
E-Mail : dsw@bamu.ac.in

डॉ. कैलास अंभुरे
संचालक,
विद्यार्थी विकास विभाग
विद्यापीठ परिसर,
छत्रपती संभाजीनगर - ४३१ ००४
(महाराष्ट्र)
मो. क्र. : ७५८८१६५२२१

संदर्भ /संविवि/२०२६-२७/ 11515-12033 दिनांक : २३.११.२०२६

प्रति,
मा. प्राचार्य
सर्व संलग्नित महाविद्यालये,
डॉ. बाबासाहेब आंबेडकर
मराठवाडा विद्यापीठ,
छत्रपती संभाजीनगर.

प्रति,
मा. सर्व विभाग प्रमुख
डॉ. बाबासाहेब आंबेडकर
मराठवाडा विद्यापीठ,
छत्रपती संभाजीनगर.

प्रति,
मा. संचालक
डॉ. बाबासाहेब आंबेडकर
मराठवाडा विद्यापीठ परिसर,
उपकेंद्र, **धाराशिव.**

विषय : 'हाच संकल्प हिच सिध्दी' सशस्त्र सेना ध्वजदिन २०२५-२०२६ निधी संकलन संकल्पना राबविण्याबाबत...

संदर्भ : अ.शा.पत्र क्र.२०२५/सा.प्र./लेखा-१/कावि-१०३ दि. १२.०२.२०२६ रोजीचे पत्र...

महोदय/महोदया,

उपरोक्त विषयानुषंगाने कळविण्यात येते की, भारतीचे सार्वभौमत्व व अखंडत्व अबाधित राखण्यासाठी आपल्या आप्तेष्टांपासून दूर राहून सरहद्दीवर अतिशय कठीण व प्रतिकुल परिस्थितीत अतुलनीय पराक्रम बजावतांना युध्दा अपंगत्व प्राप्त झालेल्या, वीरमरण पत्करलेल्या आणि सशस्त्र दलांतून निवृत्त्व झालेल्या जवानांच्या पुनर्वसनाच्या विविध कल्याणकारी योजना राबविण्यासाठी संपूर्ण भारतात दि. ०७ डिसेंबर हा 'ध्वजदिन' म्हणून पाळण्यात येतो व त्यानिमित्ताने दि. ७ डिसेंबर ते पुढील वर्षाच्या नोव्हेंबर अखेरपर्यंत निधी संकलित केला जातो. ध्वजदिन निधीचा हा उद्देश समोर ठेवून यावर्षी **'हाच संकल्प हिच सिध्दी'** ही संकल्पना राबविण्याचा संकल्प करण्यात आला आहे. सदर संकल्प व त्याचा उद्देश डोळ्यासमोर ठेवून आपण आपल्या जिल्ह्यात महाविद्यालय/शैक्षणिक विभागाद्वारे सशस्त्र सेना ध्वजदिन निधी संकलित करण्यात मोलाचे सहकार्य करावे, ही विनंती.

धन्यवाद,

संचालक
विद्यार्थी विकास विभाग

सोबत : १. ध्वजदिन ७ डिसेंबर २०२५ शासन निर्णय.
२. विभागीय आयुक्त, छत्रपती संभाजीनगर ध्वजनिधी संकलन पत्र.

महाराष्ट्र शासन

पोलीस महासंचालक कार्यालय, महाराष्ट्र राज्य

महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय, शहीद भगतसिंग मार्ग, कुलाबा, मुंबई ४०० ००१

क्र.पोमसं/३६/र.वका.(८३००)शा.नि.-अधिसूचना/०७/२०२५, मुंबई, दि. ई.स्वाक्षरीत नमुद

संदर्भ:- महाराष्ट्र शासन, गृह विभाग, शासन निर्णय क्रमांक मासैध्द-२०२५/प्र.क्र.३७४/मासैक, दि.०८/१२/२०२५

विषय :- ध्वजदिन ७ डिसेंबर, २०२५

*****

महाराष्ट्र शासन, गृह विभाग, शासन निर्णय क्रमांक मासैध्द-२०२५/प्र.क्र.३७४/मासैक दि. ०८/१२/२०२५ ची प्रत महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याचा संगणक सांकेतांक २०२५१२०८१५५६४९८२०७ असा आहे.

२. तरी, सदर शासन निर्णयानुसार कृपया योग्य ती कार्यवाही करण्यात यावी.

(चंद्रशेखर शिंदे)
पोलीस महासंचालक यांचे उपसहायक (र.व.का) (अति.कार्यभार)
पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकरिता.

प्रति,

महासंचालक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, महाराष्ट्र राज्य ,मुंबई. (सस्नेह)
पोलीस महासंचालक, लोहमार्ग, महाराष्ट्र राज्य, मुंबई(सस्नेह).
पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई.
अपर पोलीस महासंचालक, गुन्हे अन्वेषण विभाग, महाराष्ट्र राज्य, पुणे.
अपर पोलीस महासंचालक,(आस्थापना/कायदा व सुव्यवस्था /आर्थिक गुन्हे/दहशतवाद विरोधी पथक/ विशेष कृती/ प्रशासन/ वाहतूक/ प्रशिक्षण व खास पथके / फोर्स वन नागरी हक्क संरक्षण/ सायबर सुरक्षा / रा.रा.पो.बल / महिला व बाल अत्याचार प्रतिबंधक विभाग), महाराष्ट्र राज्य, मुंबई.
आयुक्त, राज्य गुप्तवार्ता विभाग, महाराष्ट्र राज्य,मुंबई.
सर्व पोलीस आयुक्त (लोहमार्ग सह)
अपर पोलीस महासंचालक, व संचालक, महाराष्ट्र पोलीस अकादमी, नाशिक.
अपर पोलीस महासंचालक व संचालक, दळणवळण, माहिती तंत्रज्ञान व परिवहन, महाराष्ट्र राज्य, पुणे.
पोलीस महानिरीक्षक, (नियोजन व समन्वय) , महाराष्ट्र राज्य, मुंबई.

विशेष पोलीस महानिरीक्षक, व्हीआयपी सुरक्षा, महाराष्ट्र राज्य, मुंबई./ मोटर परिवहन विभाग, पुणे/ नक्षल विरोधी अभियान, नागपूर.
विशेष पोलीस महानिरीक्षक (आस्थापना/ कायदा व सुव्यवस्था/ प्रशासन/ प्रशिक्षण व खास पथके), महाराष्ट्र राज्य, मुंबई.
सर्व परिक्षेत्रीय विशेष पोलीस महानिरीक्षक / पोलीस उप महानिरीक्षक.
विशेष पोलीस महानिरीक्षक, राज्य राखीव पोलीस बल, पुणे व नागपूर.
संचालक व विशेष पोलीस महानिरीक्षक, महाराष्ट्र गुप्तवार्ता प्रबोधिनी,पुणे.
सर्व पोलीस अधीक्षक (गुन्हे/ बिनतारी संदेश/लोहमार्ग).
पोलीस अधीक्षक, विशेष कृती दल, सुराबर्डी, अमरावती रोड, नागपूर.
प्राचार्य, गुन्हे अन्वेषण प्रशिक्षण केंद्र, नाशिक.
सर्व प्राचार्य पोलीस प्रशिक्षण केंद्र.
सर्व समादेशक, राज्य राखीव पोलीस बल, गट क्र.१ ते १९.
सहायक पोलीस महानिरीक्षक (का.व सु. / दक्षता/ धोरण/ नि.व स.), महाराष्ट्र राज्य, मुंबई.
पोलीस महासंचालक यांचे सर्व वरिष्ठ उप सहायक / उपसहायक.
सर्व कार्यासन अधिकारी, का क्र.१ ते ४४

प्रत :-

पोलीस उप अधिक्षक, संगणक कक्ष, पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

२. पोलीस उप अधिक्षक, यांना विनंती करण्यात येते की, सदरहू शासन निर्णयाची प्रत या कार्यालयाच्या www.mahapolice.gov.in या संकेतस्थळावर शासन निर्णय/परिपत्रके “सर्वसाधारण" या सदराखाली प्रकाशित करण्यात यावा.

ध्वजदिन ७ डिसेंबर, २०२५

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग,
शासन निर्णय, क्रमांक : मासैध्व-२०२५/प्र.क्र.३७४/मासैक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक :- ०८ डिसेंबर, २०२५.

प्रस्तावना:-

माजी सैनिकांच्या कल्याणकारी कार्यक्रमासाठी संपूर्ण भारतात ०७ डिसेंबर हा "ध्वजदिन" म्हणून पाळण्यात येतो व त्या निमित्ताने ७ डिसेंबर ते पुढील वर्षाच्या नोव्हेंबर अखेर पर्यंत निधी गोळा केला जातो. भारताच्या संरक्षणासाठी ज्यांनी आपले प्राणार्पण केले, अशा जवानांच्या कुटुंबियांच्या जीवनातील अडी-अडचणी दूर करून त्यांचे दैनंदिन जीवन सुसह्य व्हावे यासाठी तसेच युध्दात अपंगत्व प्राप्त झालेल्या आणि सशस्त्र दलातून निवृत्त झालेल्या जवानांच्या पुनर्वसनाच्या विविध कल्याणकारी योजना राबविण्यासाठी या निधीचा विनियोग केला जातो.

२. मे, १९९९ पासून जम्मू-काश्मीर मधील नियंत्रण रेषेजवळ निर्माण झालेल्या युध्दजन्य तणावाची परिस्थिती हाताळताना अथवा देशातील सर्वच क्षेत्रांत/अंतर्गत सुरक्षा मोहिमेत/ चकमकीत धारातीर्थी पडलेल्या सैन्यदलातील तसेच सीमा सुरक्षा बल व इतर तत्सम निमलष्करी दलातील महाराष्ट्रातील अधिकारी/जवान यांना तसेच त्यांच्यावर अवलंबून असलेल्या कुटुंबीयांना राज्य शासनातर्फे १ जानेवारी, २०१९ पासून प्रत्येकी रु.१ कोटी इतकी आर्थिक मदत करण्यात येते. तसेच उपरोक्त कार्यवाहीत अपंगत्व आलेल्या सदरहू दलांतील महाराष्ट्रातील अधिकारी/जवानांना त्यांच्या अपंगत्वाचे प्रमाण लक्षात घेऊन १ जानेवारी २०१९ पासून राज्य शासनातर्फे रुपये २० ते ६० लाखापर्यंत आर्थिक मदत करण्यात येते. याव्यतिरिक्त, अन्य योजनांनुसारही राज्यातील सैनिकांना त्यांच्या कुटुंबियांना अर्थसहाय्य केले जाते. त्यानुसार, सन २०२५-२०२६ या वर्षाकरिता ध्वजदिन निधी संकलनाचा इष्टांक ठरविणे व त्याचे नियोजन करण्याची बाब विचाराधीन होती,

शासन निर्णयः-

१. माजी सैनिकांच्या पुनर्वसनाच्या विविध कल्याणकारी योजना राबविण्याकरिता सन २०२५-२०२६ या वर्षामध्ये राज्याचा ध्वजदिन निधी इष्टांक रु.४०,००,००,०००/- (रुपये चाळीस कोटी) इतका निश्चित करण्यात आला आहे. सदरहू रक्कम दिनांक ७ डिसेंबर, २०२५ ते ३० नोव्हेंबर २०२६ या कालावधीत जमा करावयाचा आहे. त्यानुसार, मे २०२६ पर्यंत, ठरविलेल्या उद्दिष्टाच्या ७५% आणि ऑगस्ट २०२६ पर्यंत ९०% उद्दिष्ट गाठण्यासाठी जिल्हाधिकारी यांनी कालबध्द कार्यक्रम आखून उद्दिष्ट साध्य करावे असे अपेक्षित आहे. प्रत्येक जिल्ह्यातून ध्वजदिन निधी जमा करण्याचा इष्टांक सोबतच्या विवरणपत्रात दिलेला आहे.

२. जिल्हा स्तरावर निधी गोळा करण्याच्या या कार्यक्रमाचे संयोजन जिल्हाधिकारी करतील व या करिता खालीलप्रमाणे समिती असेल :-

१) जिल्हाधिकारी	--	अध्यक्ष
२) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद	--	सदस्य
३) जिल्हा पोलीस अधीक्षक व / अथवा पोलीस उप आयुक्त	--	सदस्य
४) जिल्हा उद्योग अधिकारी	--	सदस्य
५) जिल्हा शिक्षणाधिकारी	--	सदस्य
६) जिल्हा प्रसिध्दी अधिकारी	--	सदस्य
७) जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी	--	सदस्य सचिव

हा कार्यक्रम यशस्वी व्हावा या दृष्टिकोनातून जिल्हाधिकारी वरील सदस्यांव्यतिरिक्त जिल्ह्यातील सुयोग्य शासकीय अधिकाऱ्यास आवश्यकतेप्रमाणे या समितीमध्ये सदस्य म्हणून समाविष्ट करू शकतील. त्याचप्रमाणे जिल्ह्यातील माजी सैनिकांच्या पुनर्वसनामध्ये ज्यांना (रस) आहे, अशा काही ज्येष्ठ माजी सैनिक अधिकाऱ्यांचा किंवा शासकीय व्यक्तींचा तसेच जिल्ह्यातील उद्योग, सहकार, व्यापार, शैक्षणिक इत्यादी क्षेत्रातील मान्यवर व्यक्तींचाही समावेश जिल्हाधिकारी या समितीमध्ये करू शकतील. परंतु, या समितीची एकूण सदस्य संख्या २० पेक्षा अधिक असू नये.

३. निधी गोळा करण्याच्या कामी अत्यल्प निधी देणारे लहानसहान देणगीदारही फार मोलाचे ठरतात. उदा. सर्व जिल्ह्यांतील प्रत्येक शासकीय, निम-शासकीय किंवा खाजगी शाळांतील प्रत्येक विद्यार्थ्यांमार्फत जरी थोड्या-थोड्या प्रमाणात देणगी गोळा केली, तरी अशा रितीने एकत्रित झालेला निधी हा मोठ्या प्रमाणात जमा होत असतोच शिवाय लहानसहान गटांना निधी गोळा करण्याच्या कामी सामावून घेतल्याने, जिल्ह्यातील प्रत्येक कुटुंबात सहभागाची/ सहकार्याची भावना आपोआपच निर्माण होते. असा निधी गोळा करताना तो ज्यांच्याकडून गोळा केला आहे त्यांना निश्चितपणे त्याबाबतची पावती देण्याची दक्षता सर्वांनी घ्यावी. जिल्ह्यामध्ये कशा पध्दतीने निधी गोळा करावा, यासाठी विविध क्षेत्रांतील व्यक्ती आणि संस्था यांचा सहभाग या कार्यक्रमात कसा असावा, तसेच हा कार्यक्रम यशस्वी व्हावा या दृष्टिकोनातून प्रसिध्दीचे माध्यम काय असावे व शासनाच्या विविध विभागांना, तसेच जिल्हा परिषद, नगर परिषद, केंद्र व राज्य शासकीय कार्यालये, अनुदानित संस्था, शैक्षणिक व इतर संस्था, कारखाने, सहकारी बँका, सहकारी संस्था यामध्ये इष्टांकाचे वाटप कसे करण्यात यावे, याबाबतचा विचार उपरोक्त समितीने करावा.

४. जिल्हाधिकारी यांनी आपापल्या जिल्ह्यात ध्वजदिन निधी गोळा करण्याच्या कार्याचा शुभारंभ मा. पालकमंत्र्यांच्या हस्ते घेण्याबाबत प्रयत्न करावेत व या शुभारंभास यथायोग्य प्रसिध्दी द्यावी. मुंबई मध्ये शुभारंभाचा कार्यक्रम प्रतिवर्षी मा. राज्यपालांच्या हस्ते राजभवनात करण्यात येतो. या वर्षीही सदरचा कार्यक्रम जिल्हाधिकारी, मुंबई आणि जिल्हाधिकारी, मुंबई उपनगरे यांनी संयुक्तपणे आयोजित करण्यात आला आहे.

५. **अ)** ध्वजदिन निधी गोळा करताना त्यामध्ये कोणत्याही प्रकारे अपहार अथवा गैरप्रकार होणार नाही किंवा तक्रारीला वाव राहणार नाही याची पुरेपूर दक्षता घेण्यात यावी व त्याबाबतच्या सूचनांचे सर्व संबंधितांनी काटेकोरपणे पालन करण्यात यावे. संचालक, सैनिक कल्याण विभाग, पुणे यांनी याबाबत सविस्तर सूचना सर्व जिल्हाधिकारी/जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी यांना निर्गमित कराव्यात. जनतेकडून निधी गोळा करण्यासाठी खालील पध्दतींचा अवलंब करण्यात यावा :-

१) लहान ध्वज, मोटारीवर लावण्याचे ध्वज देणे,

२) जनतेकडून देणगी स्वीकारून त्याबद्दलची पावती देणे.

ध्वजदिन निधी गोळा करण्याबाबतची डबा पध्दत बंद करण्यात आलेली असून फक्त ध्वजदिन निधी संकलनाच्या शुभारंभाच्या कार्यक्रमात सिलबंद डबे उपयोगात आणता येतील. डब्यावर अनुक्रमांक टाकण्यात येऊन किती डबे वापरात आणावयाचे आहेत याबाबत जिल्हाधिकारी यांची टिप्पणीवर मंजुरी घेण्यात यावी. तसेच कार्यक्रमानंतर जिल्हाधिकारी यांच्या आदेशानुसार गठित समितीसमोर डबे उघडण्यात येऊन प्राप्त निधी संबंधित खात्यात त्वरित जमा करण्यात यावा.

ब) ध्वजदिन निधी संकलनासाठी पुरविण्यात आलेले साहित्य हे त्या-त्या वर्षीमध्येच वापरायचे असून त्या ध्वजदिन वर्षात उपयोगात न आणले गेलेले साहित्य कोणत्याही परिस्थितीत पुढच्या ध्वजदिन वर्षासाठी वापरण्यात येऊ नये. तसेच मागील ध्वजदिन वर्षाचे प्रलंबित निधी/ साहित्य जमा करून हिशोब प्राधान्याने पूर्ण करण्यात यावा. याबाबतच्या सूचना जिल्हाधिकारी यांच्यामार्फत जिल्ह्यातील ध्वजदिन निधी संकलन करणाऱ्या यंत्रणांना निर्गमित करण्यात याव्यात. अशा प्रकारे वापरात आलेल्या ध्वजदिन निधी साहित्याचा हिशोब पूर्ण करण्याची जबाबदारी संबंधित जिल्हाधिकारी व जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी यांची राहील.

क) कोणत्याही प्रकारच्या माजी सैनिक संघटनांना सशस्त्र सेना ध्वजदिन निधी संकलित करता येणार नाही.

६. ध्वजदिन निधीस द्यावयाचे, योगदान हे जिल्हा स्तरावर जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी यांचे कार्यालयात **"जिल्हाधिकारी व अध्यक्ष, जिल्हा सैनिक कल्याण, कार्यालय" आणि विभागीय स्तरावर "संचालक, सैनिक कल्याण विभाग"** यांच्या नावाने धनादेशाद्वारे जमा करण्यात यावे. वरील पध्दतीनुसार गोळा केलेल्या निधीचा हिशेब व नोंदवही जिल्हाधिकारी कार्यालयात व्यवस्थितपणे ठेवण्याची जबाबदारी जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी किंवा जिल्ह्यात ज्या अधिकाऱ्यांकडे हा कार्यभार सोपविला आहे त्यांचेवर राहील.

वरील जिल्हा समितीची बैठक महिन्यातून एक वेळा घेण्यात यावी व त्या बैठकीमध्ये प्रत्येक महिन्यात किती निधी गोळा करण्यात आला याचा आढावा घेऊन त्यासंबंधीची माहिती संचालक, सैनिक कल्याण विभाग, पुणे यांच्याकडे प्रत्येक महिन्याच्या ५ तारखेपर्यंत पाठवावी व संचालक, सैनिक कल्याण विभाग, पुणे यांनी सर्व जिल्ह्यांचा दरमहा एकत्रित अहवाल प्रत्येक महिन्याच्या १५ तारखेपर्यंत तसेच ध्वजदिन निधी संकलनाचा सविस्तर अहवाल पूर्ण तपशिलासह, जिल्हानिहाय, दिनांक ०६ डिसेंबर, २०२६ पर्यंत शासनास (सामान्य प्रशासन विभाग/कार्यासन-२८) सादर करावा.

७. जरी ध्वजदिन निधी गोळा करण्याचा कालावधी ७ डिसेंबर, २०२५ ते ३० नोव्हेंबर, २०२६ असला तरी डिसेंबर २०२५ ते मे २०२६ हा कालावधी प्रमुख कालावधी समजून त्या कालावधीत दिलेल्या इष्टांकाच्या ७५% निधी गोळा केला जाईल, अशा तऱ्हेने जिल्हा समितीने नियोजन करावे. तसेच, संचालक, सैनिक कल्याण विभाग, पुणे, संबंधित जिल्ह्याचे जिल्हाधिकारी व जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी यांनी मागील वर्षीचे जिल्हानिहाय उद्दीष्ट, झालेले निधी संकलन, सदर निधीच्या अनुषंगाने जिल्हानिहाय लाभार्थी व लाभार्थी/ प्रकरणनिहाय रक्कम वाटप यांचा तपशिल, जिल्हाधिकारी व जिल्हा सैनिक कल्याण कार्यालयांनी ठळकपणे त्या त्या ठिकाणी प्रसिध्द करावा. तसेच याबाबतची राज्यातील जिल्हानिहाय लाभार्थ्यांचा सविस्तर तपशिल सैनिक कल्याण विभागाने त्यांच्या अधिकृत संकेतस्थळावर प्रसिद्ध करुन वेळोवेळी तो अद्ययावत करावा. संचालक, सैनिक कल्याण विभाग, पुणे यांनी या निधीच्या लाभार्थ्यांचा सविस्तर जिल्हानिहाय वार्षिक तपशिल निश्चितपणे शासनास (सामान्य प्रशासन विभाग/कार्यासन-२८) नोव्हेंबर अखेरपर्यंत पाठवावा.

८. विभागीय स्तरावर विभागीय आयुक्त यांनी जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद आणि इतर संबंधित विभागीय अधिकारी यांच्या नियमित बैठका घेऊन जिल्हानिहाय ध्वजदिनाचा दिलेला इष्टांक पूर्ण करण्यासाठी करण्यात येत असलेले प्रस्ताव व जमा केलेला निधी यासंबधीचा आढावा घेण्यात यावा आणि प्रत्येक जिल्ह्यास दिलेले उद्दिष्ट निश्चितपणे पूर्ण होईल, या दृष्टिकोनातून संनियंत्रण करावे.

९. सर्व मंत्रालयीन विभागांनी त्यांच्या विभागाच्या अधिपत्याखालील क्षेत्रिय, जिल्हा आणि तालुका स्तरावरील कार्यालये आणि इतर संस्था यांना या कामासाठी सर्वतोपरी सहाय्य/मदत करून जास्तीत जास्त निधी गोळा करण्याकरिता कसोशीने प्रयत्न करण्याबाबतच्या सूचना सर्व संबंधितांना देण्याची कृपया दक्षता घ्यावी.

१०. सदर शासन निर्णय, महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक सांकेतांक क्र. २०२५१२०८१५५६४९८२०७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने सांक्षाकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Digitally signed by GANESH NIVRUTTI PAWAR
Date: 2025.12.08 15:58:27 +05'30'

(गणेश पवार)

उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. मा. राज्यपाल यांचे सचिव, महाराष्ट्र राज्य, मुंबई,
२. मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई,
३. मा. उपमुख्यमंत्री यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई,
४. सर्व मा. मंत्री/ राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
५. मा. विरोधी पक्षनेता, विधानसभा, विधानपरिषद, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधान भवन, मुंबई,

६. सर्व सन्माननीय विधानसभा / विधानपरिषद व संसद सदस्य,
७. मा. मुख्य सचिव यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई.
८. शासनाचे सर्व अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव,
९. सर्व विभागीय आयुक्त / सर्व जिल्हाधिकारी /सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी,
१०. सर्व महानगरपालिका/नगरपालिका यांचे आयुक्त/मुख्याधिकारी,
११. 'प्रबंधक, मा. उच्च न्यायालय, अपील शाखा/ मूळ शाखा, मुंबई,
१२. प्रबंधक, मा. लोकायुक्त व मा. उप लोकायुक्त यांचे कार्यालय, मुंबई,
१३. मा.आयुक्त, राज्य निवडणूक आयोग, मुंबई,
१४. सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई,
१५. सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई,
१६. अधिदान व लेखा अधिकारी, महाराष्ट्र, मुंबई.
१७.सर्व मंत्रालयीन विभाग, मंत्रालयीन विभागाच्या अधिपत्याखालील सर्व विभाग प्रमुख आणि कार्यालय प्रमुख,
१८. निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई,
१९. सर्व जिल्हा कोषागार अधिकारी,
२०. संचालक, सैनिक कल्याण विभाग, पुणे/ संचालक, सैनिकी सेवापूर्व शिक्षण संस्था, छत्रपती संभाजीनगर,
२१. राज्य शासनाची सर्व महामंडळे आणि उपक्रम यांचे व्यवस्थापकीय संचालक,
२२. माहिती व जनसंपर्क महासंचालक (प्रसिध्दी पत्रक काढण्याच्या विनंतीसह)
२३. शिक्षण संचालक / उच्च शिक्षण संचालक / तंत्र शिक्षण संचालक / कृषि संचालक / पशुसंवर्धन संचालक (वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालक),
२४. महालेखापाल, महाराष्ट्र-१, मुंबई: महालेखापाल, महाराष्ट्र-२, नागपूर,
२५. सामान्य प्रशासन विभागातील सर्व कार्यासने,
२६. निवड नस्ती (२ प्रती).

परिशिष्ट “अ”					
सशस्त्र सेना ध्वजदिन २०२५ च्या निधी संकलनाकरिता प्रस्तावित इष्टांक					
अ.क्र.	जिल्हा	ध्वजदिन २०२४ करीता दिलेला इष्टांक	३१ ऑगष्ट २०२५ अखेर झालेले संकलन	संकलनाची टक्केवारी	ध्वजदिन २०२५ करीता प्रस्तावित इष्टांक
१	२	३	४	५	६
कोकण विभाग					
१	मुंबई शहर	३८२०००००	२२४४९०००	५८.७७	३८२०००००
२	मुंबई उपनगर	३८२०००००	२०२२००००	५२.९३	३८२०००००
३	ठाणे	२०६०००००	११३२१०००	५४.९६	२०६०००००
४	पालघर	२८५००००	२३६७०००	८३.०५	२८५००००
५	रायगड	६८०००००	३६४५०००	५३.६०	६८०००००
६	रत्नागिरी	६८०००००	३८२७२५१	५६.२८	६८०००००
७	सिंधुदुर्ग	४१२५०००	३३१५०००	८०.३६	४१२५०००
	एकूण	११७५७५०००	६७१४४२५१	५७.११	११७५७५०००
नाशिक विभाग					
८	नाशिक	१५५०००००	१८६७००००	१२०.४५	१५५०००००
९	धुळे	६८०००००	५७६६००	८४.७१	६८०००००
१०	नंदुरबार	४०५००००	३१४३०५७	७७.६१	४०५००००
११	जळगांव	१३२०००००	८९९२०००	६८.१२	१३२०००००
१२	अहिल्यानगर	२०७०००००	४५६७६०७२	२२०.६६	२०७०००००
	एकूण	६०२५००००	८२२४७१२९	१३६.५१	६०२५००००
पुणे विभाग					
१३	पुणे	२९१०००००	१५२८२०००	५२.५२	२९१०००००
१४	सातारा	१५९०००००	१०७९००००	६७.८६	१५९०००००
१५	सांगली	१५९०००००	१३४७५०००	८४.७५	१५९०००००
१६	सोलापूर	१७२०००००	१७७११०१२	१०२.९७	१७२०००००
१७	कोल्हापूर	१८०००००	१६६१५०००	९२.३१	१८०००००
	एकूण	९६१०००००	७३८७३०१२	७६.८७	९६१०००००
छत्रपती संभाजीनगर					
१८	छ.संभाजीनगर	१३४०००००	७०४००००	५२.५४	१३४०००००
२९	जालना	४२५००००	९३५५०००	२२०.१२	४२५००००
२०	परभणी	३९५००००	२६५००००	६७.०९	३९५००००
२१	हिंगोली	३१२५०००	३९३००००	१२५.७६	३१२५०००
२२	बीड	३९५००००	१३१५००००	३३२.२३	३९५००००
२३	नांदेड	५०५००००	२८६५०००	५६.७३	५०५००००
२४	धाराशिव	५७०००००	१३४०८००००	२३५.२३	५७०००००
२५	लातूर	४७०००००	१०६६००००	२२६.८१	४७०००००
	एकूण	४४१२५०००	६३०५८०००	१४२.९१	४४१२५०००

शासन निर्णय क्रमांकः मासैध्व-२०२५/प्र.क्र.३७४/मासैक,

अ.क्र.	जिल्हा	ध्वजदिन २०२४ करीता दिलेला इष्टांक	३१ ऑगष्ट २०२५ अखेर झालेले संकलन	संकलनाची टक्केवारी	ध्वजदिन २०२५ करीता प्रस्तावित इष्टांक
१	२	३	४	५	६
अमरावती विभाग					
२६	अमरावती	१२३०००००	१३४३५०००	१०९.२३	१२३०००००
२७	बुलढाणा	५९५००००	४६२५०००	७७.७३	५९५००००
२८	अकोला	८२०००००	९०२५०००	११०.०६	८२०००००
२९	वाशिम	५४०००००	५५५००००	१०२.७८	५४०००००
३०	यवतमाळ	६६५००००	८४८००००	१२७.५२	६६५००००
	एकूण	३८५०००००	४१११५०००	१०६.७९	३८५०००००
नागपूर विभाग					
३१	नागपूर	२१५०००००	३०७६००००	१४३.०७	२१५०००००
३२	वर्धा	६७५००००	६८९००००	१०२.०७	६७५००००
३३	भंडारा	३९५००००	३६५००००	९२.४१	३९५००००
३४	गोंदिया	३७०००००	२४८४०००	६७.१४	३७०००००
३५	चंद्रपूर	४४५००००	४०४६०००	९०.९२	४४५००००
३६	गडचिरोली	३१०००००	७६००००	२४.५२	३१०००००
	एकूण	४३४५००००	४८५९००००	१११.८३	४३४५००००
३७	सैकवि येथे जमा		७४४१५००		
	एकूण	४०००००००	३८३४६८८९२	९५.८७	४०००००००

जितेंद्र पापळकर
भा.प्र.से.
विभागीय आयुक्त

अ.शा.पत्र.क्र.२०२५/सा.प्र./लेखा-१/कावि-१०३
विभागीय आयुक्त कार्यालय,
छत्रपती संभाजीनगर विभाग,
छत्रपती संभाजीनगर – ४३१ ००१
☎ : ०२४०-२३३१२९४ / २३५००४४ (का)
E-mail : divcomcsn@gmail.com

दिनांक : 12/02/2026

विषय:- "हाच संकल्प हिच सिध्दी" सशस्त्र सेना ध्वजदिन २०२५- २०२६ निधी संकलन संकल्पना राबविण्याबाबत.

भारताचे सार्वभौमत्व व अखंडत्व अबाधित राखण्यासाठी आपल्या आप्तेष्टांपासून दूर राहून सरहद्दीवर अतिशय कठीण व प्रतिकुल परिस्थितीत अतुलनीय पराक्रम बजावून देशभक्तीचे उत्कृष्ट उदाहरण भारतीय सैनिक आपल्या समोर ठेवत असतात. वेळ प्रसंगी सर्वोच्च बलिदान देवून विरमरणही पत्करतात, अशा युद्धात अपंगत्व प्राप्त झालेल्या, विरमरण पत्करलेल्या आणि सशस्त्र दलांतून निवृत्त झालेल्या जवानांच्या पुनर्वसनाच्या विविध कल्याणकारी योजना राबविण्यासाठी संपूर्ण भारतात ०७ डिसेंबर हा "ध्वजदिन" म्हणून पाळण्यात येतो व त्या निमित्ताने ७ डिसेंबर ते पुढील वर्षाच्या नोव्हेंबर अखेर पर्यंत निधी संकलित केला जातो. ध्वजदिन निधीचा हा उद्देश समोर ठेवून यावर्षी "हाच संकल्प हिच सिध्दी " ही संकल्पना राबविण्याचा संकल्प करण्यात आला आहे. दरवर्षी नित्यनियमाप्रमाणे ध्वजदिन निधीची उभारणी केली जाते. या वर्षीचा (२०२५) ध्वजदिन निधी हा कालबध्द कार्यक्रम आखून संकलित करणे हाच या वर्षाचा संकल्प राहिल व तो माहे मे २०२६ पर्यंत १००% टक्के पूर्ण करून आपल्याला सिध्दीस नेणे आहे.

मागील वर्षी महाराष्ट्र शासनाने मराठवाडा विभागास दिलेला ध्वजदिन निधीचा इष्टांक विभागातील छत्रपती संभाजीनगर, जालना, हिंगोली, बीड, धाराशिव व लातूर या जिल्हयांनी १००% पूर्ण केल्याबद्दल प्रथमतः मी त्या जिल्हयांचे अभिनंदन करतो. यावर्षी सुध्दा शासनाकडून मराठवाडा विभागास ध्वजदिन निधी वर्ष २०२५-२०२६ संकलित करण्यासाठी दिलेला १००% इष्टांक पूर्ण करणे अभिप्रेत आहे.

मराठवाड्यातील ध्वजदिन निधी संकलनाची पार्श्वभूमी लक्षात घेता यावर्षी ध्वजदिन निधीचा इष्टांक हा आपल्या अधिपत्याखालील विविध शासकीय / निमशासकीय / खाजगी संस्थेतील अधिकारी / कर्मचारी यांचेकडून प्राधान्याने वैयक्तिक योगदानातून / माहे एप्रिल २०२६ च्या वेतनातून कपात करून जास्तीत जास्त निधी माहे मे २०२६ पर्यंत उभारुन या संकल्पनेला यशस्वी करून उदिष्टपूर्ती करुया व या पवित्र, अनमोल व उदात्त राष्ट्रीय कार्यास सहकार्य करुन एका नविन वेगळ्या वाटचालीला प्रारंभ करुया, असे सर्वांना आवाहन आहे. सर्व साधारणपणे ध्वजदिन निधीच्या रक्कमेची अधिकारी / कर्मचारी यांचेकडून त्यांचे वर्गवारीनुसार खालीलप्रमाणे उभारणी करावी. याशिवाय एखाद्या अधिकारी /

Scanner AI Pro

कर्मचा-यास जास्तीची रक्कम द्यावयाची असल्यास ते देवू शकतील व कमी रक्कम द्यावयाची असल्यास त्यासही बंधन नाही.

अ.क्र.	गट	निधीची रक्कम
१	गट अ वरील वरिष्ठ दर्जाचे अधिकारी	रूपये ४,०००/-
२	गट अ अधिकारी	रूपये २,५००/-
३	गट ब व तत्सम दर्जाचे अधिकारी	रूपये १,५००/-
४	गट क कर्मचारी	रूपये ८००/-
५	गट ड कर्मचारी	रूपये ५००/-

सदर संकल्प व त्याचा उद्देश समोर ठेवून आपण आपल्या जिल्हात सशस्त्र सेना ध्वजदिन निधी संकलित करण्यात मोलाचे सहकार्य कराल अशी मी अपेक्षा करतो. मला अभिमान वाटतो की, मराठवाडा अनेक क्षेत्रात अग्रेसर बनलेला असून, याही कामात अग्रेसर राहणार याचा मला विश्वास आहे.

आपला,

(जितेंद्र पापळकर, भा.प्र.से.)
विभागीय आयुक्त छत्रपती संभाजीनगर

प्रति,

१. सर्व जिल्हाधिकारी, छत्रपती संभाजीनगर विभाग.
२. सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, छत्रपती संभाजीनगर विभाग.
३. सर्व महानगरपालिका आयुक्त, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, लातूर,परभणी, जालना.
४. सर्व वरिष्ठ कोषागार अधिकारी /कोषागार अधिकारी छत्रपती संभाजीनगर विभाग.
५. सर्व शाखा प्रमुख, विभागीय आयुक्त कार्यालय, छत्रपती संभाजीनगर.
६. जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय, छत्रपती संभाजीनगर यांना देऊन सुचित करण्यात येते की, विभागातील इतर सर्व शासकीय/निमशासकीय कार्यालयांना सदर आवाहन पत्र आपले स्तरावरुन पाठविण्यात यावे.

Scanner AI Pro